# जाहीर नोटीस

मध्यवर्ती संशोधन केंद्र वाकवली अंतर्गत पांगारी येथील प्रक्षेत्रावर खालिल प्रमाणे कामे करावयाची आहेत.

| अ क्र | गट क्र | कामाचा तपशिल | झाडे संख्या |
|---|---|---|---|
| 1 | 01 to 07 | आंबा झाडांवरील बांडगुळे, डेडवुड, वांझ फांद्या तोडून गोळा करून ढीग करून ठेवणे **(कालावधी २५.१०.२०२२ ते ३१.१२.२०२२)** | 6237 |
| 2 | 01 to 07 | आंबा झाडांवर औषधांच्या तिन फवारण्या करणे. **(कालावधी २५.१०.२०२२ ते २५.०२.२०२३)** | 6237 |
| 3 | 01 to 07 | आंबा झाडांभोवती पॉवर ट्रिलरने नांगरट करणे. (२५.१०.२०२२ ते ३१.१२.२०२२) | 6237 |
| 4 | 01 to 07 | गट क्र.१ ते ७ मधील आंबा लागवडीतील मेलेल्या झाडांचे जागेवर १.५' x १.५' आकाराचे खडडे खोदून आंबा कलमे लावण्याचे काम करणे (२५.१०.२०२२ ते ३०.०१.२०२३) | 1070 |
| 5 | 01 to 07 | गट क्र.१ ते ७ मधील आंबा लागवडीतील झाडांना रिंगा खोदणे (२५.१०.२०२२ ते ३०.०१.२०२३) | 6237 |
| | | **एकुण** | |

उपरोक्त प्रमाणे प्रक्षेत्रावरील कामे ठेका पध्दतीने करावयाची आहेत. कामाच्या अटी व शर्ती इत्यादी माहिती तसेच भरून दयावयाचे संमतीपत्र आणि दरपत्रक नमूना या कार्यालयात कार्यालयीन कामाच्या दिवशी व कार्यालयीन वेळेत उपलब्ध होईल. कंत्राटी कामाचे दरपत्रकामध्ये प्रती मजुर/प्रती झाड मजुरी दराचा स्पष्टपणे उल्लेख करावा. दरपत्रक या कार्यालयाने तयार केलेल्या नमूना पत्रामध्येच भरून द्यावयाचे आहे. आपले दरपत्रक आणि संमतीपत्र या कार्यालयात दिनांक १४.१०.२०२२ पर्यंत किंवा त्यापुर्वी पोहोचेल असे पाठवावे. विहीत दिनांकानंतर प्राप्त होणा-या दरपत्रकांचा विचार करण्यात येणार नाही. लखोटयावर **"पांगारी विभागाअंतर्गत कंत्राटी कामे"** असा उल्लेख करावा, लिफाफा मोहोरबंद करून मा. संचालक, मध्यवर्ती संशोधन केंद्र वाकवली (पांगारी विभाग) यांचे नावे पाठवावा. पोस्टाव्दारे होणा-या विलंबास हे कार्यालय जबाबदार असणार नाही. दरपत्रक स्विकारणे अथवा नाकारणेचा अधिकार निम्नस्वाक्षरीकार यांचा राहील. दरपत्रकाच्या अटी व शर्ती सोबत जोडण्यात येत असून त्या ठेकेदारास बंधनकारक असतील. सदर अटी व शर्ती मान्य असल्यास दरपत्रक सादरीकरणाचे वेळी मान्यतेबाबत स्वाक्षरी करून दरपत्रकासोबत जोडण्यात याव्यात.

प्रभारी अधिकारी,
पांगारी विभाग
मध्यवर्ती संशोधन केंद, वाकवली,
ता. दापोली, जि. रत्नागिरी